लोकमत

# क्विक Update



## प्रतीक्षा पांगे यांचा पुरस्काराने गौरव

**उमरगा** : तालुक्यातील कोरेगावची कन्या प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला क्विक हिल फाउंडेशनचा बेस्ट सेक्रेटरी रनर अप-१ हा पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय आणि पुण्यातील क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम लातूर, धाराशिव, सोलापूर, परभणी जिल्ह्यातील शाळा, कॉलेज आदी ठिकाणी राबविण्यात आला. यात प्रतीक्षा रमेश पांगे हिला क्विक हिल फाउंडेशनचा बेस्ट सेक्रेटरी रनर अप-१ हा पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.